# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## जाहीर आवाहन

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना जनहित याचिका क्र. १५५/२०११ च्या अनुषंगाने जाहीर आवाहन करण्यात येते की,

सर्व नागरिक तसेच राजकीय पक्ष, राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस, राजकीय व्यक्तींची एखाद्या पदावरील नियुक्ती, राजकीय नेत्यांचे / मान्यवरांचे स्वागत करण्यासाठी विविध सणानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी व त्याप्रसंगी लावण्यात येणाऱ्या अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजीटल फ्लेक्स, कमानी इत्यादीबाबत संबंधित यंत्रणाकडून कार्यवाही होत नसल्याबाबत मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सार्वजनिक रस्त्यावरील अथवा शासकीय, खाजगी जागेतील अनधिकृत / विना परवाना बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजीटल फ्लेक्स, कमानी इत्यादीवर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायद्यांतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नोडल अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. नितीन कृष्णाजी शिंदे | मालमत्ता व्यवस्थापक तथा सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ | ९८५०२२८८३३ |
| २. | श्री. एस. एस. खरात | सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. २ | ९९२२४१६०२६ |
| ३. | श्री. दत्तात्रेय गायकवाड | सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. ३ व ४ | ९०९६५५८५४४ |

तरी, मनपा क्षेत्रात कोणीही विना परवाना बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजीटल फ्लेक्स, कमानी इ. लावू नयेत. अन्यथा संबंधितांवर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायद्यांतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नागरिकांनी मनपा क्षेत्रात कोणतेही अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजीटल फ्लेक्स, कमानी निदर्शनास आल्यास वर नमूद केलेल्या नोडल अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे, एस.एम.एस.द्वारे, व्हॉटस्‌अॅपद्वारे तसेच महानगरपालिकेचे टोल फ्री क्रमांक १८०० २३३ २३७४ व १८०० २३३ २३७५ यावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवावी.

सांगली
दि. ०८-०६-२०२२

नितीन कापडणीस
महानगरपालिका आयुक्त